# बॉम्बे डाईंगचा विपणनावर अधिक भर

**मुंबई–** २०२० पर्यत रिटेल व्यवसायाच्या रु. १००० कोटी इतक्या तिप्पट एकूण उत्पन्नाचे ध्येय समोर ठेवून बॉम्बे डाईंग रिटेलने आपल्या विस्ताराची योजना जाहीर केली. कंपनीने तंत्रज्ञान, गुणवत्ता आणि ब्रँडमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करायला सुरुवात केली आहे आणि बाकी असलेली रक्कम प्रचारात्मक उपक्रम आणि जाहिराती यांच्यासाठी खर्च केली जाणार आहे. ऑनलाइन मार्केट प्लेसमध्ये आपल्या उत्पादनांना चांगला प्रतिसाद बघता याचा फायदा उचलण्यासाठी कंपनी लवकरच ई–कॉमर्स व्यासपीठ घेऊन येत आहे.